RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

शुक्रवार, ३० मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५२ | दैनिक | किंमत : ₹५/-

Friday, 30 May 2025 | Year : 5 | Issue : 152 | Daily | Rate: Rs. 5/-




## आता संस्थाचालक पोलिसांच्या रडारवर!

### शाळांमध्ये संस्थाचालकांचे नातेवाईक

अनेक शाळांमध्ये संस्थांचालकांचे नातेवाईक नोकरीला आहेत. तसेच, वरिष्ठ शिक्षकांना खालच्या पदावर ठेवून नातेवाईकांना पदोन्नती दिली गेली आहे. हा अधिकार संस्थाचालकांना असतो. याचा गैरफायदा घेण्यात आल्याचे चित्र आहे. विशेष म्हणजे, काही शिक्षकांचा पैशांसाठी छळ सुरू असून त्यांचे वेतन रोखण्यात आल्याच्याही तक्रारी आहेत




**नागपूर :** 'शालार्थ आयडी' घोटाळ्यामध्ये आतापर्यंत शिक्षण उपसंचालक दर्जाच्या पाच अधिकाऱ्यांना अटक झाली आहे. आता शिक्षकांच्या मान्यतेचे बनावट प्रस्ताव सादर करून शाळेत शिक्षक भरती करणाऱ्या संस्थाचालकांवरही कारवाई होणार आहे. अनेक संस्थाचालकांविरोधात विशेष तपास पथकाकडे (एसआयटी) तक्रारी आल्या असून त्यांचाही तपास केला जाणार आहे. या घोटाळ्यात 1056 नियुक्त शिक्षकांची यादी जाहीर करण्यात आली. 2019 ते 2025 पर्यंत गैरमार्गाने 'शालार्थ आयडी' तयार करून शासनाचे कोट्यवधी रुपये लाटण्यात आले. शिक्षण संस्था चालक, शिक्षण उपसंचालक आणि वेतन अधीक्षकांच्या संगनमताने लाखो रुपयांचा आर्थिक व्यवहार करून हा सर्व घोटाळा झाला. संस्थाचालकांनीही यात आर्थिक गैरप्रकार केला. त्यामुळे त्यांच्यावर कारवाई कधी होणार, असा प्रश्न उपस्थित केला जात होता. अनेक शिक्षक आणि त्यांच्या नातेवाईकांनी संस्थाचालकांविरोधात 'एसआयटी'कडे तक्रारी केल्या आहेत. त्यानुसार, आता संस्थाचालकांवर कारवाईचे संकेत मिळत आहेत. *'शालार्थ आयडी' घोटाळ्यात संस्थाचालकही एसआयटीच्या रडारवर आहेत. आमच्याकडे अनेक संस्थांविरोधात तक्रारी आहेत. त्यांची चौकशी होणार आहे. तसेच नीलेश वाघमारे आणि मेंढे हे दोघेही फरार असून तपास सुरू आहे.* ***– सुनीता मेश्राम, सहाय्यक पोलीस आयुक्त व एसआयटी प्रमुख.***
शालार्थ आयडी घोटाळ्याचा 'एसआयटी'कडून कसून तपास सुरू असून अटकेत असलेले चिंतामण वंजारी, वैशाली जामदार, आणि लक्ष्मण मंघाम यांची कारगृहात रवानगी करण्यात आली.

### संचमान्यतेपूर्वीच शिक्षकांच्या बदल्यांचा घाट

**अलिबाग :** जून महिन्याची चाहू लागली तरी प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांचा प्रश्न मार्गी लागलेला नाही. राज्य शासनाच्या सुधारीत संचमान्यता धोरणाला राज्यातील प्राथमिक शिक्षकांचा विरोध असताना, शासनाने संच मान्यता निश्चित करण्यापूर्वीच शिक्षकांच्या बदल्यांसाठी हालचाली सुरू केल्या आहेत. मात्र संच मान्यतेपूर्वीच बदल्या झाल्या तर शिक्षकांना पुन्हा बदल्यांना सामोरे जावे लागण्याची शक्यता आहे. जुन्या पद्धतीने संचमान्यता निश्चित करावी नंतरच बदल्या कराव्यात अशाई मागणी शिक्षक परिषदेनी केली आहे. राज्य सरकारचा शालेय शिक्षण विभाग आणि ग्रामविकास विभागात समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. याचा फटका शिक्षकांना बसणार आहे. जर आता एखाद्या शिक्षकाची विशिष्ट शाळेवर बदली झाली आणि नंतर होणाऱ्या संचमान्यतेत तो शिक्षक संबंधित शाळेवर अतिरिक्त ठरला तर त्याची पुन्हा बदली होईल. यामध्ये त्या शिक्षकासह त्याच्या कुटुंबाची ससेहोलपट होणार असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे. शिक्षक संच मान्यता हा विषय शालेय शिक्षण विभागाकडे येतो तर शिक्षकांच्या बदल्यांचा विषय ग्रामविकास विभागाकडे येतो. दोन्ही विभागांमध्ये समन्वय नसल्याने ही समस्या उदभवली आहे. मुळातच मे महिन्यात शिक्षकांच्या बदल्या होणे अपेक्षित होते परंतु संचमान्यतेअभावी अद्याप बदल्या रखडल्या आहेत. शाळा सुरू व्हायला अवघे काही दिवस उरले आहेत अशावेळी बदलीपात्र शिक्षकांच्या पाल्यांचे शाळेतील प्रवेश देखील रखडले आहेत. आपल्या पाल्याला एखाद्या शाळेत प्रवेश घेतला आणि बदली दुसरीकडे झाली तर काय करायचे असा प्रश्न शिक्षकांना सतावतो आहे. 15 मार्च 2024 च्या शासन निर्णयानुसार झालेल्या बदलाच्या अनुषंगाने कार्यवाही झाली तर एखाद्या शाळेत इयता सहावी ते आठवी चे वर्ग मिळून 20 पेक्षा कमी पटसंख्या असेल तर एकही शिक्षक मान्य होत नाही. परिणामी अनेक पदवीधर शिक्षक रिक्त ठरण्याची भीती शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे तसेच पूर्वी विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकसंख्या निर्धारित होती नव्या निकषानुसार विद्यार्थी संख्या वाढवण्यात आली आहे परिणामी अनेक शाळांना अपेक्षेपेक्षा कमी शिक्षक उपलब्ध होणार असल्याने विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार आहे.

#### नव्या संचमान्यतेला विरोध का?

शासनाच्या या धोरणामुळे सहावी ते आठवीतील राज्यभरातील शिक्षक अतिरिक्त ठरतील तसेच ग्रामीण भागातील सहावी ते आठवीचे वर्ग बंद पडण्याची शक्यता आहे. उच्च प्राथमिक शाळेत वर्ग सहा ते आठ तिन्ही वर्ग असतील तर तीन शिक्षक मान्य होण्यासाठी 78 पटसंख्या असणे आवश्यक आहे या अगोदरची 61 पटसंख्या असल्यास तीन तीन शिक्षक मान्य होत होते ज्या शाळेत वर्ग सहावी ते सातवी किंवा सहावी ते आठवी असे एकूण 20 पेक्षा कमी विद्यार्थी तेथे एक शिक्षक मान्य करण्यात आले आहेत त्यामुळे अशा शाळांमधील विद्यार्थ्यांना दाखले घेऊन दुसऱ्या शाळेमध्ये जावे लागण्याची शक्यता आहे.

### इलॉन मस्क यांनी आठवड्याला किमान 40 तास काम करावे : टेस्ला



**नवी दिल्ली :** जगातील सर्वात श्रीमंत व्यक्तींपैकी एक असलेले आणि टेस्लाचे सीईओ इलॉन मस्क यांना त्यांच्या टेस्ला कंपनीतील काही प्रमुख गुंतवणूकदारांनी औपचारिकपणे एक विनंती केली आहे. इलॉन मस्क यांनी आठवड्यातील किमान 40 तास काम करावे, अशी मागणी टेस्लाच्या गुंतवणूकदारांनी केली आहे. या मागणीच्या पाठिमागचे कारण देखील स्पष्ट करण्यात आले आहे. कारण गेल्या काही महिन्यांपासून टेस्लाच्या अलिकडच्या विक्रीत मोठ्या प्रमाणात घट झाल्याचे सांगितले जाते. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या सरकारमध्ये इलॉन मस्क हे काही प्रमाणात सहभागी असल्यामुळे त्यांचे टेस्लाकडे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा याआधी देखील झाली होती. एवढेच नाही तर त्यावरूनच काही दिवसांपूर्वी टेस्लातील गुंतवणूकदार निराश असल्याचेही बोलले जात होते.

### चिनी विद्यार्थ्यांचा व्हिसा अमेरिकेने केला रद्द



**नवी दिल्ली :** अमेरिकेने नुकताच काही चिनी विद्यार्थ्यांचा व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. आता अमेरिकेच्या या निर्णयावर चीन सरकारने टीका केली असून, अमेरिकेचा हा निर्णय 'अवास्तव' आणि वैचारिकदृष्ट्या प्रेरित असल्याचे म्हटले. अमेरिकेचे परराष्ट्र सचिव मार्को रुबियो यांनी चिनी कम्युनिस्ट पार्टीशी संबंध असलेल्या विद्यार्थ्यांना लक्ष्य करून कठोर व्हिसा धोरणे जाहीर केल्यानंतर, चीनने याचा अमेरिकेकडे औपचारिक निषेध नोंदवला आहे. याला चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी दुजोरा दिला आहे.

### एमपीएससी'च्या ऐतिहासिक 2795 जागांच्या जाहिरातीसमोर नवीन अडचण

**नागपूर :** पशुसंवर्धन विभागाचे काम पूर्ण क्षमतेने करण्यासाठी राज्याच्या पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी महत्त्वाचे पाऊल उचलले असून विभागातील रिक्त पदे भरण्याचा निर्णय त्यांनी घेतला. त्याअंतर्गत पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील 2795 पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आल्याची माहिती पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली होती. त्यानंतर एमपीएससीने जाहीरात काढली. यासाठी शेकडो विद्यार्थ्यांनी अर्जही केले आहे. परंतु, या पदासाठी जाहीरात केलेल्या उमेदवारांसमोर एक धोका निर्माण होण्याची




शक्यता आहे.
पशुधन विकास अधिकारी पदासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोकमार्फत (एमपीएससी) भरती प्रक्रिया सुरू आहे. एकूण 2795 जागांसाठी ही भरती आहे. ज्यात गट अ संवर्गातील पदांचा समावेश आहे. 29 एप्रिल ते 18 मे दरम्यान यासाठी हजारो उमेदवारांनी अर्ज केले आहेत. ग्रामीण भागात पशुसंवर्धन विभागाचे काम गतीने व पूर्ण क्षमतेने होण्यासाठी पशुसंवर्धन विभागातील पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय आयुक्तालय तसेच त्यांच्या अधिनस्त क्षेत्रिय कार्यालयातील पशुधन विकास अधिकारी पद महत्त्वाचे आहे. सुधारित आकृतीबंधानुसार महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ अंतर्गत पशुधन विकास अधिकारी संवर्गात एकूण 4684 पदे मंजूर आहेत. त्यापैकी सद्यःस्थितीत 1886 पदे भरलेली असून 2798 पदे रिक्त आहेत. तसेच 31 डिसेंबर 2025 अखेर 8 पदे सेवानिवृत्तीमुळे रिक्त होणार आहेत, अशी एकूण 2806 पदे रिक्त होणार आहेत. ही पदे रिक्त असल्याने कामकाजावर परिणाम होत होता.

### आंध्रप्रदेशमध्ये तयार होणार लढाऊ विमाने : मुख्यमंत्री नायडू




**अमरावती :** कर्नाटक आणि आंध्र प्रदेश या दोन राज्यांत सरकारी संरक्षण कंपनी 'हिंदुस्तान एरोनॉटिक्स लिमिटेड' (एचएएल) वरून वाद सुरू झाला आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी एचएएलचे कामकाज त्यांच्या राज्यात विस्तारित करण्याबाबत केलेल्या वक्तव्यानंतर हा वाद सुरू झाला आहे. कर्नाटकने त्यांच्या विधानावर आक्षेप घेतला आहे. भारताची प्रमुख एरोस्पेस आणि संरक्षण कंपनी असलेल्या एचएएलकडे कर्नाटकातील बंगळुरू आणि तुमकुरु येथे प्रमुख उत्पादन सुविधा आहेत. आता आंध्र प्रदेश एचएएलचे ॲडव्हान्स्ड मीडियम कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एएमसीए) आणि लाईट कॉम्बॅट एअरक्राफ्ट (एलसीए) उत्पादन बंगळुरूहून आंध्र प्रदेशात वळवण्याची मागणी करत असल्याची माहिती आहे. आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री नायडू यांनी त्यांच्या राज्यात एचएएलचे युनिट्स स्थापन करण्यासाठी केंद्राशी संपर्क साधल्याची माहिती आहे. गेल्या आठवड्यात झालेल्या निती आयोगाच्या बैठकीत नायडू यांनी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांना ही विनंती केल्याचे सांगितले जात आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांच्याशी झालेल्या बैठकीतही हा विषय मांडण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

### सर्व मुस्लीम प्रभू रामांचे वंशज... : जमाल सिद्दिकी



**नवी दिल्ली:** सर्व मुस्लीम हे प्रभू श्रीरामाचे वंशज असल्याचे विधान भारतीय जनता पक्षाच्या अल्पसंख्याक संघटनेचे अध्यक्ष जमाल सिद्दिकी यांनी केले आहे. त्यांच्या या विधानावरून सध्या चर्चा चालू असून त्यावर प्रतिक्रिया उमटू लागल्या आहेत. याशिवाय, मुस्लीम धर्माचे मूळ, हिंदू देवी-देवतांचे मुस्लीम प्रथांमधील स्थान आणि भारतात राहणाऱ्या विविध समुदायांचा एकमेकांमध्ये गुंफलेला वारसा यासंदर्भातदेखील जमाल सिद्दिकी यांनी यावेळी भूमिका मांडली. सनातन धर्म हा इस्लमा धर्माच्याही खूप आधी अस्तित्वात आला, तो मानवी संस्कृतीचा पाया आहे, असे विधान जमाल सिद्दिकींनी केले. 'सनातन धर्म इस्लामच्या खूप आधी अस्तित्वात आला. ज्या मुस्लिमांचा राम किंवा कृष्ण यांच्यावर विश्वास नाही, त्यांना मुस्लीम म्हणताच येणार नाही', असे म्हणत सिद्दिकी यांनी इस्लाममध्ये अनेक प्रेषितांचा उल्लेख करण्यात आल्याचा दावा केला.

### 'भीम जयंती' हा मराठी चित्रपट आज संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारावर आधारित भिमजयंती या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. या चित्रपटाची शुटींग वर्धा जिल्ह्यातील देवळी, वर्धा, सेलु, सांवगी (मेघे) येथे करण्यात आले असून जवळ पास 30 दिवसात चित्रपटाचे चित्रीकरण संपन्न झाले. या चित्रपटामध्ये एक स्त्री आपल्या पतिला कशा प्रकारे चांगला मार्ग दाखवून व मार्गदर्शन करून एक डेव्हपर्स उद्योगपती कशाप्रकारे बनवते यांचे जीवंत उदाहरण या चित्रपटामध्ये आहे. हा चित्रपट स्त्रीप्रधान असून महान, सामाजिक पारीवारिक असा हा रंगीन चित्रपट असून लोकांना मंत्रमुग्ध करणारा आहे. या चित्रपटामध्ये 4 (चार) गाणी असून संगीतकार बाबा जागिरदार यांनी म्युझिक दिले आहे. गायक स्वप्नील बांदोडकर, रेश्मा सोनवणे, वैशाली सामंत, गायकवाड यांनी गाणी गायली असून याचे पोस्ट प्रोडक्शन शंकुतलम स्टुडीओ मुंबई येथे झाले. चित्रपटाची शुटींग चालू असतांनी लोकेशन्स निवडणे व वेळेवरती काही बदल होत असल्यामुळे लोकेशन्स मिळवण्या करीता तारेवरची कसरतच झाली आहे. बऱ्याचशा अडचणींना तोंड देवून मी हा चित्रपट पूर्ण केला व आज प्रदर्शनास सज्ज आहे. 30 मे 2025 रोजी विदर्भातील सर्व जिल्हयांमध्ये चित्रपट प्रदर्शीत होत आहे. या चित्रपटाची निर्मिती उमेश क्रियेशनच्या बॅनरवरती होत असून लेखक निर्मात उमेश म्हैसकर आहेत. सहनिर्माते म्हणून यशवंत भांडेकर, उज्वला भांडेकर, वर्षा म्हैसकर, संतोष मेंढेकर यातील प्रमुख कलाकार हर्षवर्धन शिंदे, श्रेय्यानी काशीद, अजय राठोड, उमेश म्हैसकर, रिया पाटील, उत्कर्ष म्हैसकर, प्रशांत तोतला, कॅमेरामॅन युवराज केळवदकर, ॲक्शन डॉयरेक्टर मोहम्मद अली. नृत्यदिग्दर्शक मंगेश देवके, कौसर शेख, गितकार संजय भन्साळ, ऑडीटर वीर प्रसाद, साऊंड डिझायनर चिन्मय परडा, सह दिग्दर्शक मुकुंद पगारे, नागपूरची कलाकार सीमा सपकाळ, उज्वला रोडगे, साधना रामटेके, अशोक गवळी, सुनिल हिरेखन, या कलाकारानी सुध्दा उत्कृष्ट भुमिका केली आहे. मी या चित्रपटाचा दिग्दर्शक विलास गाडगे म्हणून आपल्या वृत्तपत्राच्या माध्यमातून सर्व जनतेला विनंती करतो आहे की हा चित्रपट थियेटर पर्यंत जावून बघावा व आपल्या भीमजयंती चित्रपटाला उत्कृष्ट प्रतिसाद देण्यासाठी दिग्दर्शक विलास गाडगे यांनी पत्रकार परिषदेत चित्रपटा संदर्भात माहिती दिली.

### निधन वार्ता

#### डॉ. मनोहर ताकसांडे



**नागपूर :** भगवान नगर बॅनर्जी लेआउट येथील प्रतिष्ठित रहिवासी डॉ मनोहर ताकसांडे यांचे आजाराने दि. 29 मे रोजी सकाळी निधन झाले. त्यांचे वय 81 वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी एक मुलगा सून व नातवंड व मोठा आप्त परिवार आहे. अंत्ययात्रा दि. 30 मे रोजी सकाळी 9.30 वाजता त्यांच्या निवास स्थानावरून घाटरोड मोक्षधामला निघणार आहे.

### युवा धोरण आढावा समितीत एकही युवा नाही!



**मुंबई :** देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारकडून राज्यातील युवा धोरणाचा आढावा घेण्यासाठी शासकीय समितीची घोषणा करण्यात आली आहे. दरम्यान या सर्वपक्षीय समितीमध्ये फक्त सत्ताधारी पक्षातील आमदारांचा समावेश करण्यात आला असून तरुण आमदारांना देखील डावलण्यात आल्याचा मुद्दा विरोधकांकडून उपस्थित केला जात आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या नेत्या आणि खासदार सुप्रिया सुळे यांनी सोशल मीडियावर याबद्दल पोस्ट केला आहे. यामध्ये 2012 साली जेव्हा राज्याचे युवा धोरण तयार झाले तेव्हा युवा आमदार देवेंद्र फडणवीस यांना कशी संधी देण्यात आली होती याची आठवण सुळे यांनी करून दिली आहे.
'राज्याच्या युवा धोरणाचा आढावा घेणाऱ्या शासकिय समितीची घोषणा शासनाच्या माध्यमातून करण्यात आली. परंतु यामध्ये एकाही युवा आमदाराचा समावेश नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे. सभागृहात युवा आमदार नाहीत, अशीही बाब नाही. यातही केवळ सत्ताधारी आमदारांना समाविष्ट करून घेण्यात आले आहे. एकही महिला लोकप्रतिनिधी या समितीत नाही. शासकिय समित्यांची रचना करताना त्यात विविध मतांना प्रतिनिधित्व देण्याची महाराष्ट्राची परंपरा आहे. दुर्दैवाने या परंपरेला कुठे तरी तडा जातोय अशी या समितीची रचना आहे.'
'माननीय मुख्यमंत्री महोदयांना मी मुद्दाम आठवण करुन देऊ इच्छिते की सन 2012 साली जेंव्हा राज्याचे युवा धोरण तयार झाले त्या समितीत तत्कालीन युवा आमदार देवेंद्र फडणवीस म्हणजे आपला प्राधान्याने समावेश करण्यात आला होता.
या धोरणाच्या एका उपसमितीचे आपण अध्यक्ष होता. आपण त्यावेळी या समितीत मोलाचे योगदान दिले होते. पण आज आपल्याच नेतृत्वाखाली राज्य असताना युवा आमदारांना संधी मिळत नाही ही खेदाची बाब आहे. माझी आपल्याकडे आग्रही मागणी आहे की कृपया आपण या समितीची फेररचना करावी आणि यामध्ये प्राधान्याने युवा आमदारांना संधी देताना सर्वपक्षीय आमदारांचा समावेश करावा असे सुप्रिया सुळे म्हणाल्या आहेत.






## संपादकीय

# सरकारवर केलेली टीका म्हणजे राजद्रोह

सोशल मीडियावर कंटेंट क्रिएट करणाऱ्या लोकांवर कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नाही. गेल्या काही कालावधीमध्ये वादग्रस्त वक्तव्य किंवा वादग्रस्त कार्यक्रम सादर करून अडचणीत आलेल्या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा विचार केला, तर आपण काय सादर करत आहोत त्याचे भान राहात नसल्याने हे सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्स अडचणीत येऊ लागले आहेत. 'सरकारवर केलेली टीका म्हणजे राजद्रोह' हे समीकरण अतिशय धोकादायक आहे. प्रा. महमुदाबाद प्रकरणामुळे याबाबत नव्याने विचार व्हावा. प्रा. अली खान महमुदाबाद यांनी 'ऑपरेशन सिंदूर'च्या संदर्भात 'एक्स'वर लिहिलेल्या एका पोस्टमुळे त्यांना अटक करण्यात आली होती. त्यांनी याविरुद्ध सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली होती. बुधवारी या प्रकरणाचा निकाल आला असून न्यायालयाने अंतरिम जामीन मंजूर केला आहे. मात्र, या प्रकरणाचा सुरू असलेल्या तपासाला स्थगिती देण्यास न्यायालयाने नकार दिला आहे. त्याचप्रमाणे प्रा. महमुदाबाद यांना त्यांचे पारपत्र न्यायालयात जमा करण्याचा आदेश दिला आहे. शिवाय पहलगाम हल्ल्याबद्दल कोणीही समाज माध्यमांवर कोणतीही टिप्पणी करू नये अशी सूचना न्यायालयाने केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयावर उलटसुलट चर्चा सुरू आहे. न्यायालयाने जरी प्रा. महमुदाबाद यांना जामीन मंजूर केला असला तरी त्यासोबत एसआयटी गठीत करण्याची काय गरज होती, प्रा. महमुदाबाद यांचा अपराध एवढा मोठा आहे का वगैरे मुद्द्यांची जोरदार चर्चा सुरू आहे. प्रा. महमुदाबाद यांच्या पोस्टची भाषा धार्मिक असल्याचा आक्षेप न्यायालयाने घेतला आहे. 'प्रत्येकजण उच्चारस्वातंत्र्य आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्याबद्दल बोलतो. मात्र हा अधिकार अमर्याद नाही. जणूकाही या देशात अधिकारांचे वाटपच केले जात आहे', असेही न्यायालयाने नमूद केले आहे. न्यायालयाने प्रा. महमुदाबाद यांनी वापरलेल्या भाषेवर नापसंती व्यक्त केली आहे. एवढेच नव्हे तर प्राध्यापकासारख्या व्यक्तीकडे शब्दांची कमतरता नसावी असेही म्हटले आहे. हे प्राध्यापक इतरांच्या भावना न दुखावता सुद्धा स्वतःच्या भावना व्यक्त करू शकले असते वगैरे न्यायालयांच्या मतांमुळे चर्चांना उधाण आले आहे. मीडियाच्या शोधातच पाकिस्तानची आयएसआय गुप्तहेर संघटना आहे असे दिसते. ज्योती मल्होत्राला अटक केल्यानंतर जो तपास झाला त्यामध्ये जी माहिती समोर आली आहे त्यामध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने ज्योतीला पाकिस्तानची हेर म्हणून तयार करण्यात आले हे दिसत आहे. महत्त्वाची गोष्ट अशी आहे की देशातील जो अधिकृत मीडिया आहे म्हणजे वृत्तपत्रे किंवा वृत्तवाहिन्या त्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी त्यांच्या स्वतःच्या यंत्रणा आहेत. देशाच्या कानाकोपऱ्यामध्ये महत्त्वाच्या शहरांमध्ये स्लीपर सेल डेव्हलप करून त्यांच्या माध्यमातून माहिती मिळवण्याचे आणि दहशतवादी हल्ल्याच्या वेळी सहाय्य घेण्याचे कामही केले जाते, असे अनेक वेळा सिद्ध झाले आहे. कोणत्याही देशाची गुप्तहेर संघटना इतर देशांमध्ये आपल्या संघटनेच्या माध्यमातून गुप्त माहिती मिळवण्याचे काम करतच असते. देशात आयएसआय संघटनेचे अधिकृत एजंटही असे अधूनमधून पकडले जात असतात. पण ते शिक्षित एजंट असतात. ज्या प्रकारे सोशल मीडियाचा वापर करणाऱ्या आणि लोकप्रिय झालेल्या काही महत्त्वाच्या इन्फ्लुएन्सर्सचा हेरगिरीसाठी वापर करण्याची रणनीती आयएसआयने आखली आहे, त्याचा विचार आता गांभीर्याने करावा लागणार आहे. गेल्या काही वर्षांमध्ये इंटरनेटचा वापर मोठ्या प्रमाणात वाढल्यानंतर सोशल मीडियाच्या विविध प्लॅटफॉर्ममध्येही वाढ झाली. या प्लॅटफॉर्मचा वापर करून आपला कंटेंट समाजातील विविध थरांपर्यंत पोचवून आणि प्रतिसाद मिळवून चांगले उत्पन्न मिळवणारे काही सोशल मीडिया इन्फ्लुएन्सरही तयार झाले आणि लोकप्रियही झाले. गेल्या काही दिवसांमध्ये भारतात विविध ठिकाणी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी 11 जणांना अटक केली आहे. ते सर्वजण सोशल मीडियाशी संबंधित असून इन्फ्लुएन्सर्स म्हणून लोकप्रिय आहेत. आपण शत्रू राष्ट्राच्या ट्रॅपमध्ये अडकत आहोत त्याची कल्पनाही त्यांना येत नाही. ज्या प्रकारे हनी ट्रॅपचा वापर करून सरकारी अधिकारी किंवा दूतावासातील कर्मचारी यांना अडकवले जाते आणि त्यांच्याकडून महत्त्वाची माहिती मिळवली जाते, त्याच प्रकारे आता या सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर्सचा वापरही आयएसआयकडून केला जात आहे. प्रा. मेहमुदाबाद यांच्या पोस्टमध्ये सरकारी धोरणांवर टीका केली होती. त्यात वापरलेली भाषा कडक होती हे जरी मान्य केलं तरी त्यातून 'राजद्रोह' असा अतिशय गंभीर गुन्हा घडला, असे म्हणता येणार नाही. राजद्रोहाच्या खटल्यांत वेगळाच मुद्दा दडलेला आहे. या कलमाखाली अटक झाली की सुटका व्हायला अनेक वर्षे लागतात. काही प्रसंगी दहा वर्षे लागल्याची उदाहरणे आहे. ही कोणत्याही सरकारची ट्रीक असते. आपल्या विरोधकावर या कलमाखाली खटला दाखल करायचा. म्हणजे मग तो तुरुंगात सडत बसतो आणि नंतर निकाल लागून अनेकदा सुटतो. पण एवढी वर्षे तुरुंगात सडवला त्याचे काय? आजपर्यंतची उपलब्ध आकडेवारी दाखवते की या कलमाखाली दाखल केलेल्या खटल्यात निर्दोष सुटण्याचे प्रमाण फार मोठे आहे. प्रा. मेहमुदाबाद खटल्याच्या निमित्ताने या सर्वांचा पुनर्विचार व्हावा. ■■

बहुजन सौरभ

# वैनगंगेच्या खोऱ्यातील गावे तहानलेली..!

**वैनगंगा खोऱ्यात लहान मोठे 149 धरणे आहेत. त्या सर्वांची साठवण क्षमता 60 टीएमसीच्या आंत आहे. परिणामी वैनगंगा खोऱ्यातील 280 टीएमसी पाणी वाहून जाते. यातील 62 टीएमसी पाणी नळगंगा नदीजोड प्रकल्पाकडे वळविले जाणार आहे. कालव्यांचे जाळे सडक अर्जुनी, साकोली सारख्या तालुक्यात पोहोचलेले नाही, ज्यामुळे पाणी कार्यक्षमतेने वापरले जात नाही. सडक अर्जुनी, साकोली, सालेकसा, अर्जुनी मोरगाव यासारख्या तालुक्यांमध्ये कालवे न्यावित. नवे नविन धरणे बांधावी. हाजरा फॉलजवळ व चूलबंद नदीवर बंधारे बांधावे. जोडीला भूजल पूनर्भरणाच्या योजना राबविण्याची गरज आहे.**



बहुजन सौरभ

वैनगंगेचे खोरे झाडीपट्टीसाठी वरदान आहे. ही निसर्गाची देण. तिचा पुरेपूर उपयोग व्हावा. थेंब, थेंब पाणी अडवावा. त्यांचा सिंचनासाठी वापर व्हावा. शेतकऱ्यांची शेती फुलावी. त्यासाठी सरकारने हातभार लावावा. योजना आखाव्यात. ही अपेक्षा. त्या अपेक्षांची पूर्ती नाही. परिणामी वैनगंगेचे पाणी धो, धो डोळ्या देखत वाहून जाते. त्या पाण्याने गोसेखूर्द सारखे आणखी काही धरणे भरतील. 2021 मध्ये सतत अतिवृष्टी झाली. तेव्हा गोसेखूर्द धरणाच्या धारण क्षमते ऐवढे पाणी सांडव्यातून सोडावे लागले. यावरून किती पाणी वाहून जाते. हे लक्षात येते. या खोऱ्यातील सुपीक मातीला पाण्याची जोड हवी. हे घडले तर झाडीपट्टीचा पंजाब बनेल. धनधान्याचा कोठार ठरेल. गोसेखूर्द धरणाचे काम 51 वर्षांपासून चालू आहे. अद्याप अर्धवट आहे. मुळ बजेट 372 कोटी रूपयांचा होता. तो 20 हजार कोटीवर पोहचला. म्हणजे 54 पटीने वाढला. बावनथडी प्रकल्पाला देखील 37 वर्ष लागले होते. या उलट मराठवाड्यातील जायकवाडी धरण अकरा वर्षात पुर्ण झाला. वैनगंगा नदी खोऱ्यात सिंचनाची प्रंचड क्षमता आहे. त्याकडे राज्यकर्त्यांचा कानाडोळा आहे. त्यांचा झाडीपट्टीला फटका बसत आहे. या भागातील जिल्हे भकास होत आहेत. शेतीचे पाणी विसरा. हजारों गावे तहानलेली आहेत. पिण्याच्या पाण्यासाठी मौताज आहेत. अगोदर विहिरी आटल्या. आता कुपनलिका कोरड्या पडल्या. पाणी संकट ओढावले. भविष्यात पाण्यासाठी गावें सोडावी लागतील. अशी भयावह स्थिती आहे. खोऱ्यातील पाणी अडविले जात नसल्याने पूराच्या स्वरूपात वाहून जाते. तर दुसरीकडे नदीजोड प्रकल्पाच्या माध्यमातून खोऱ्यातील पाणी पळविण्याच्या योजना आहेत. वैनगंगा नदीचा उगम मध्यप्रदेशातील मुंडरा गावाजवळ आहे. सातपूडा पर्वतरांगामधून निघून महाराष्ट्रातील गोंदिया जिल्ह्यात प्रवेश करते. दक्षिण-पूर्व दिशेने वाहत पुढे जाते. या नदी खोऱ्याच्या तोंडावर गोंदिया जिल्हा वसलेला आहे. गोसेखूर्द धरण भंडारा जिल्ह्यातील पवनी तालुक्यात आहे. त्याचे पाणी नागपूर, भंडारा व चंद्रपूर जिल्ह्याला मिळते. लागून असलेल्या गोंदिया जिल्ह्याला एक थेंब मिळत नाही. पश्चिम विदर्भातील नेते दमदार निघाले. त्यांनी गोसेखूर्दचे पाणी बुलडाण्याच्या नळगंगेपर्यंत नेण्याच्या योजना आणल्या. त्यासाठी 455 किलोमीटरचा कालवा टाकला जाणार. त्यावर 20 हजार कोटी खर्च होणार. खा. प्रफुल्ल पटेल मोठे नेते आहेत. त्यांनी दम दाखविला तर नळगंगेकडे जाणारे अर्धे पाणी गोंदिया जिल्ह्यात आणू शकतात. त्यासाठी पन्नास ते शंभर किलोमीटरचा कालवा लागेल. तेही शक्य नसेल तर कमीतकमी 10 टीएमसी पाणी आणून गोंदिया जिल्ह्यातील पाणी समस्या सोडवू शकतात. वैनगंगा नदी गोंदिया, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली अशी चार जिल्ह्यातून वाहते. सिरोचा तालुक्यात प्राणहिता नदीला मिळते. पुढे प्राणहिता तेलंगणाकडे जाते. महाराष्ट्रातील झाडीपट्टीतून या नदीचा 303 किलोमीटर प्रवास आहे. तिच्यात या जिल्ह्यांचा कायापालट करण्याची शक्ती आहे. झाडीपट्टीतील हजारों गावे तहानलेली आहेत. धापेवाडा उपसा सिंचनचे पाणी गोंदिया जिल्ह्यातील उमरझरी प्रकल्पात आणणार. ते पाणी सडक अर्जूनी तालुक्यातील गावांना पुरविण्याच्या कोरड्या घोषणा सुरू आहेत. नदीजोड प्रकल्पासाठी गोदावरी नदीच्या पाण्याचा वापर करता आला असता. ती देखील दक्षिण-पूर्व वाहणारी नदी आहे. ती जालना व यवतमाळ जिल्ह्यातूनही वाहते. त्या गोदावरीचे पाणी जवळ



भूपेंद्र गणवीर
9850031019

पडले असते. मात्र त्या दिशेने सत्ताधाऱ्यांनी विचारच केला नाही. कदाचित त्या भागातील जागृत जनता विरोध करील अशी भीती वाटली असेल. झाडीपट्टीत 30 टक्के आदिवासी आहेत. नेतेही जागृत नसल्याने वैनगंगेच्या पाण्यावर डल्ला मारण्याची योजना आखली. गोसेखूर्द धरणाचे दोन कालवे आहेत. एक कालवा भंडारा जिल्ह्यात जातो तो 23 किलोमीटर लांब आहे. दुसरा कालवा चंद्रपूरकडे जातो. तो 99 किलोमीटर लांब आहे. दोन्ही मिळून 125 किलोमीटरच्या आंत आहेत. डावा कालवा लाखनी तालुक्यापर्यंत गेला आहे. हा कालवा साकोली तालुका आणि पुढे सडक अर्जूनी तालुक्यापर्यंत वाढविण्यास आणखी सुमारे 70 किलोमीटर कालव्याची भर घालावी लागेल. एक किलोमीटर कालव्यास सुमारे 5 कोटी रूपये खर्च येतो. हा खर्च गृहित धरता 350 ते 500 कोटी रूपये खर्च येईल. इच्छा शक्ती असल्यास जिल्ह्याच्या शेवटच्या टोकापर्यंत पाणी नेता येईल. गोसेखूर्द ते नळगंगा हा नदीजोड प्रकल्प 2014 मध्ये आखला गेला. त्यासाठी 478 किलोमीटर लांब कालवा बांधण्याचे ठरले. तेव्हा खर्च 8294 कोटी रूपये खर्चाचा अंदाज होता. आता तो 20 हजार कोटी रूपयाचा झाला. तो गोदावरी नदीवर असता तर कदाचित अर्ध्या खर्चात झाला असता. गावगाड्यातील अंदाजाने जवळची नदी अधिक सोयीची असेच म्हणावे लागेल. प्रमुख नदी गोदावरी आहे. वैनगंगा तिची उपनदी आहे. तरी प्रमुख नदी सोडून उपनदीवर नदीजोड प्रकल्प कां असा प्रश्न पडतो. पाणी हे जीवन आहे. ते ज्या भागात असेल. त्या भागात वृक्षांची गडद छाया. फुलांचा बहर. धन, धान्याची समृध्दी दिसते. वाहत्या पाण्याचा खळखळाट असतो. त्यातून संगितांच्या लहरी उमटतात. नागरी ससंस्कृती वाढते. अनेक शतकापूर्वी हे चित्र वैनगंगेच्या खोऱ्यात होते. कडक उन्हाळ्यात नाल्यात सुध्दा फुटभर खड्डा खोदला. तर पाणी लागत असे. तेंदूपत्ता तोडण्यास जाणारे मजूर अशा खड्डेवजा चुव्यातील पाणी पित असत. जंगलात चार, मोह, भेलाव अन् टेबराची झाडे असत. त्यांच्या फळांचा संग्रह करीत. डिंक, चार बी व लाखेसाठी तर भंडारा, गोंदिया प्रसिध्द होता. लाखेची कारखाने होती. लाखेचे उत्पादन देणारे पळस आजही डौलाने डोलत आहेत. शेताच्या बांधावरची पळस झाडे कापल्या गेली. मात्र रस्त्यांच्या कडेला. वापर नसलेल्या जागेवर त्यांचे साम्राज्य असते. झाडीपट्टीतील गावांमध्ये हे चित्र हमखास दिसते. पळसाचे एक झाड शंभर नव्या झाडांना जन्म देते. त्याचे बी लावण्याची गरज नाही. ती पडेल. तिथे उगवते. हे झाड जंगल नसलेल्या भागात किंवा वाळवंटात लावले. तर हमखास नवे जंगल वाढेल. हा प्रयोग वनखात्याने हमखास करावा. काही वर्षात जंगल वाढेल अन् वाळवंट घटेल. वैनगंगा खोऱ्यातील चार जिल्ह्यांचे क्षेत्रफळ 35 हजार 583 चौ. किलोमीटर आहे. लोकसंख्या 57 लाख 98 हजार 266 आहे. तर शेतजमिन 12 लाख 3 हजार हेक्टर आहे. गोसेखूर्द धरणाची सिंचन क्षमता 2 लाख 50 हजार हेक्टर आहे. यावरून झाडीपट्टीतील शेत जमिनीसाठी गोसेखूर्द सारख्या तीन- चार धरणांची गरज आहे. तेव्हा झाडीपट्टी सुजलाम, सुफलाम होईल. समृध्दीचे गाणे गाईल. वैनगंगेच्या खोऱ्यातील गावे तहानलेली ठेवून पांचशे किलोमीटर अंतरावरील गावांची तहान भागविण्याची घाई. यात कोणते शहाणपण आहे. कोणाचा रस आणि कोणाचा स्वार्थ आहे. ■■

# महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन
## बिहारच्या सरकारी अजेंडाचा बळी



बहुजन सौरभ

जे श्रेष्ठ आहेत ते एकत्र येण्यास कचरणार नाहीत, - वैदिक परंपरेनुसार बुद्ध पौर्णिमेच्या दिवशी महाबोधी महाविहार बिहारमध्ये बनावट शिवलिंगाची हवन यज्ञ आणि आरती केल्याबद्दल बिहारच्या राज्यपालांच्या विरोधात आमचा निषेध असावा. एकमेकांच्या विरोधात नाही. बुद्ध पौर्णिमेच्या पवित्र दिवशी महाबोधी महाविहार, बिहारमध्ये हवन यज्ञ आणि वैदिक आरती करण्यास परवानगी दिल्याबद्दल बुद्ध गया व्यवस्थापन समितीचा निषेध असावा.

बुद्ध गयाच्या पंडितांनी श्रामणेर विनायाचार्य यांच्या विरोधात गुन्हा दाखल केला. विनायाचार्य यांना पोलिसांकडून अटक होण्यापासून वाचवण्यासाठी, प्रज्ञाशील भंतेजी आणि आकाश लामा यांनी त्यांचा जामीन आणि तुरुंगात जाण्यापासून संरक्षण मिळण्याची व्यवस्था केली. आजही पूज्य भन्ते डॉ. चंद्रकीर्ती, पूज्य भदंत प्रज्ञाशील आणि आकाश लामा त्यांच्या सुटकेसाठी परिश्रम घेत आहेत.

गया पोलिसांनी विनाचार्य यांना सांगितले की ते त्यांना त्यांच्या सुरक्षेसाठी घेऊन जात आहेत. पोलिसांकडून हे ऐकून, विनाचार्य पोलिसांसोबत जाण्यास तयार झाले. बिहार सरकार श्रामणेर विनाचार्य यांचा शस्त्र म्हणून वापर करून महाबोधी मुक्ती आंदोलन तोडण्याच्या कटाचा भाग म्हणून काम करत आहे. कारण जर 1949 चा बीटी कायदा रद्द केला गेला तर मनुवादी बिहार सरकारसाठी सर्वात जास्त नुकसान होईल आणि महाबोधी महाविहारातून ब्राम्हण राजवट संपेल, आमच्या निष्पाप आणि बुद्धिमान जनतेला विनंती आहे की त्यांनी चळवळीची प्रतिष्ठा समजून घ्यावी आणि बुद्धगया येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलन धरणे तोडण्याच्या कटात बिहार सरकारला पाठिंबा देऊ नये. जर महाबोधी महाविहार मुक्ती इच्छित असेल, तर बिहार सरकारने, कटाचे गांभीर्य समजून, हा संदेश शक्य तितका शेअर करावा आणि बुद्धगया येथे सुरू असलेल्या महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाला वाचवण्यास मदत करावी, बौद्ध जनतेच्या सहकार्याने चालवल्या जाणाऱ्या चळवळीला खंडित होण्यापासून वाचवावे. अखिल भारतीय बौद्ध मंच. 'एक घोषणा, एक ध्येय,' महाबोधी महाविहार 1949 च्या बौद्ध धर्म कायद्यापासून मुक्त होईल. ■■

भिक्खू धम्मशिखर
मो. 8989850668

# काशाय चिवर जेल मध्ये आहे, हा कुठला विनय ?



बहुजन सौरभ

महाबोधि बुद्ध विहार आंदोलन 100 दिवस झालेत सुरु आहे. या आंदोलनात बौद्ध भिक्खु एक दिलाने संघर्ष करत आहे. अश्यातच बुद्धिस्ट फोरम मध्ये फुट पडली? लामा व विनायाचार्य याच्यांत समज/ गैरसमज झालेत. एवढ्या कारणावरुन विनयाचार्य यांना कारागृहात टाकने कितपत योग्य आहे. विनायाचार्य चुकला असेल तर त्याला शिक्षा देण्यासाठी बुद्धाने कायदा नियम केले आहेत. मग त्याला भिक्खु संघासमोर उभे करुन शिक्षा द्यायला पाहीजे होती. कट-कारस्थान करुन शत्रुच्या बाजुने उभे राहुन काशाय वस्त्र जेलच्या कालकोठडीत डांबणे हे धम्माच्या विनयात बसत नाही. 15 दिवसानी बौद्ध भिक्खुंनी आपल्या चुकाचे निरसन करण्यासाठी बसले पाहीजे असा विनयाचा नियम आहे. मग हे तत्व अंमलात का आणले नाही. हा शिक्षा देण्याचा उत्तम उपाय होता. अनेक लोक त्याला श्रामणेर आहे असे संबोधुन चिवराचा अपमान करतात. त्याला भिक्खु मानत नाही. 'माझा प्रश्न आहे की महाराष्ट्रात अनेक श्रामणेर आहेत. आपण त्यांना 'ये श्रामणेर म्हणून आवाज देतो का? त्याला भदन्त, भिक्खु म्हणूनच संबोधतो. मग आपण तो श्रामणेर आहे असे म्हणून त्याचा अपमान करतो. हे कोणत्या नियमात बसते! सांगावे आपण. लामा ही जमात आरएसएसच्या संपर्कात राहीली. मग आपण म्हणणार लामा त्यांचा माणूस आहे. त्यामुळे आंदोलन भरकटत जाईल. आज आंदोलनात जी वर्चस्वाची लढाई सुरु आहे. ती थांबली पाहीजे. भिक्खुसंघ /उपासक/विविध संघटना यांचा समन्वय साधुन ही लढली पाहीजे. तरच हे आंदोलन यशस्वी होईल. काशाय चिवर कारागृहातून कसे लवकर बाहेर यावे यासाठी आपण सहकार्य केले पाहीजे. काशाय चिवराच्या बाजूने एक संघ उभे राहीले तरच आंदोलन बळकट होवु शकते. नाहीतर आंदोलनाची फुट ही आपल्यासाठी घातक ठरेल. नागपुरात या समुहामधून वेगळे होणारे तीन गट आहे. त्या तिन्ही मिंटींगला मी गेलो. माझे विचार मांडले. सर्वांना सुर मुक्त विहार मग एकच ध्येय असेल तर लामा व विनायाचार्य यांनी एकत्र यायला पाहीजे. आंदोलनात फुट दाखवून आंदोलन यशस्वी करता येत नाही. सभेला 10 हजार रुपये देवून मिरवायसाठी आपली सोय केलेले हे कर्मचारी, आंदोलनात कार्यकर्त्यांना बाजुने असले पाहीजे तो उग्र कार्यकर्ता असो की संयमी एक भिक्खु दुसऱ्या भिक्खुची पोलीस कम्पेलंट करत असेल तर तो विनयाचे उलंघन करत आहे. रखरखत्या उनात रसत्यावर झोपुन आंदोलन भिक्खु करत असेल तर त्याला समर्थन देणे आपले कर्तव्य आहे. आपण त्याकडे दुर्लक्ष करणे चुकीचे ठरते आणि हेच या आंदोलनाच्या फुटीचे कारण आहे. जयभीम म्हणायचे नाही, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नारे द्यायची नाही. या गोष्टीला आपल्याच लोकांनी मज्जाव करणे हे संयुक्तिक ठरत नाही. आज गरज आहे एक संघ समाजाच्या निर्मितीची. तरच हे आव्हान आपन पेलु शकतो. नागपुरातून आंदोलनाचे काम करणाऱ्या नेतृत्वाला फिटवण्याचे काम सुरु आहे. नागपुरचा दबदबा संपला 8 महिने आंदोलन करून अंबाझरीच्या आंदोलनाकडे कुणी ढूंकून पाहत नाही. आंबेडकर स्मारकाचा मुद्दा यशवंत स्टेडियमचा अजुन धुळ खात आहे. यावरुन आपल्या शक्तीचा मागोवा घ्यावा. आपली शक्ती क्षीण झाली. कार्यक्रम, उत्सव, समाजाची वर्गवारी, विघटणाचा शाप आंदोलनाला कमी लेखणारा एक वर्ग, अज्ञान, बाबुगीरीचा माज, एकमेकाबद्दल तिरस्कार, हजार संघटना, धम्मात भेसळ, मातृ संघटनेचे तुकडे या सर्व बाबी आपल्या शक्तीला शक्तीहीन करणाऱ्या ठरल्या आहेत आणि बाहेरची लोक आशा लावुन बसले. नागपूरवरुन संपुर्ण देशात आंदोलन पसरते. म्हणून इथे जास्त भर देतात त्यांना माहीत नाही. ज्या दिवशी इथली माणसे बीजेपीकडे जायला लागली, त्याच दिवशी इथली क्रांती उर्जा संपली. हेवे-दावे, मत्सर, राग, लोभ, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मलाच समजला अशी आव आणणारी विचारवंत संघाच्या गोटात जाऊन पुरस्कार घेतात इथे समाजाची हार झाली आहे. काही विचारवंत डॉ. बाबासाहेब यांच्यापेक्षाही श्रेष्ठ समजायला लागली. गांधी पुरस्कार देईल तेव्हाच हा मोठा होईल ही धारणा चळवळीला घातक ठरली, कार्यकर्त्यांची अवहेलना जमीनी मिशनरी कार्यकर्ता समाजाच्या साहेब गिरीने संपवला व नागपूर चळवळीचे केन्द्र ही ओळख या प्रवृत्तीने पुसुन टाकली. त्यामुळे आमची अवस्था 'ना घर का ना घाट का' अशी झाली. त्यामुळे आता दुसऱ्या शहराकडे डोळे लावले पाहीजे, कदाचीत ते शहर आपल्याला उर्जा प्रदान करेल. म्हणून दुसरे शहर आंदोलनाचे केंद्र बनवावे अशी आपणास विनंती! ■■



प्रवीण कांबळे
मो. 9545499931



संयोजक
स्त्री स्वातंत्र मुक्तसंवाद
प्रा. माधुरी गायधनी दुपटे
मो. 9130088095

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिलांच्या स्वातंत्र्याचे आणि सन्मानाचे शिल्पकार !

एक साधारण स्त्री आहे. पण आज जेव्हा मी स्वतःचा विचार करते. माझ्या स्वातंत्र्याचा अनुभव घेते तेव्हा मला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे योगदान लक्षात येते. त्यांच्यामुळेच मला आणि माझ्यासारख्या असंख्य महिलांना समाजात सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याची संधी मिळाली आहे. डॉ. बाबासाहेबांनी महिलांसाठी जे काम केले ते केवळ एका विशिष्ट वर्गाच्या किंवा जातीच्या महिलांसाठी नव्हते तर त्यांनी संपूर्ण भारतीय महिलांसाठी संघर्ष केला, त्यांच्या हक्कांसाठी झगडले. डॉ. बाबासाहेबांचे हिंदू कोड बिल हे भारतीय महिलांच्या हक्कांसाठी मोलाचे पाऊल ठरले. या विधेयकामुळे महिलांना संपत्तीवर अधिकार मिळाला. जो पूर्वी फक्त पुरुषांच्या हातात होता. लग्नानंतर स्त्रीला तिच्या सासरच्यांच्या मर्जीवर अवलंबून राहावे लागायचे पण या विधेयकाने तिला आर्थिक स्वायत्तता दिली. घटस्फोटाचा अधिकार मिळाल्यामुळे स्त्रियांच्या आयुष्यावरून येणारी नकारात्मक सामाजिक बंधने कमी झाली. त्यांनी दत्तक घेण्याचे आणि त्याचबरोबर संपत्तीच्या वाटपाचे कायदे करून महिलांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान दिले. हे केवळ कायद्याने मिळालेले स्थान नव्हते तर समाजातील स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व सिद्ध करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांचा हा मोठा लढा होता. या क्रांतिकारी विचारांमुळे डॉ. बाबासाहेबांना प्रचंड विरोध झाला. त्यांच्या हिंदू कोड बिलला धार्मिक नेते आणि रूढीवादी विचारसरणीच्या लोकांनी विरोध केला. महिलांना अधिकार देणे म्हणजे समाजाची परंपरा आणि धर्मशास्त्राचे उल्लंघन होईल असे अनेकांना वाटले. परंतु डॉ. बाबासाहेबांनी या विरोधाला न घाबरता आपल्या विचारांवर ठाम राहून महिलांच्या हक्कांसाठी लढा दिला. त्यांचे हे धैर्य आणि निश्चय आजही प्रेरणादायक आहे. त्यांनी समाजातील महिलांना जी ताकद दिली, ती केवळ कायद्याच्या चौकटीत सीमित राहिली नाही तर ती सामाजिक बदलाची जडणघडण ठरली आहे. डॉ. आंबेडकरांचे अजून एक मोठे योगदान म्हणजे त्यांनी महिलांच्या शिक्षणावर दिलेला भर. डॉ. बाबासाहेबांचे नेहमीच असे मत होते की महिलांनी शिक्षण घ्यायला हवे. कारण शिक्षण हेच त्यांना आत्मनिर्भर बनवू शकते. शिक्षण घेतल्यामुळेच महिलांना आपल्या हक्कांची जाणीव होते आणि त्या आपल्या अधिकारांसाठी उभे राहू शकतात. त्यांनी महिलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी अनेक चळवळी उभ्या केल्या. डॉ. बाबासाहेबांचे म्हणणे होते, 'ज्या समाजात महिलांना शिक्षण मिळत नाही, तो समाज कधीच प्रगती करू शकत नाही.' त्यांच्या या विचारसरणीमुळे अनेक स्त्रिया शिक्षण घेऊन आपल्या आयुष्याचे सोने करू शकल्या. आज मी लिहितेय, विचार व्यक्त करतेय आणि आपल्या जीवनाबद्दल निर्णय घेतेय, याचे संपूर्ण श्रेय डॉ. बाबासाहेबांना आहे. डॉ. बाबासाहेबांनी समाजातील केवळ दलित किंवा मागासवर्गीय महिलांसाठीच नाही, तर सर्वच जाती-धर्मातील महिलांसाठी समानतेची वचनबद्धता प्रस्थापित केली. त्यांच्या संविधानाच्या माध्यमातून त्यांनी महिलांना समाजात एक स्वतंत्र स्थान दिले, ज्यामुळे महिलांना स्वतःची ओळख निर्माण करण्याची संधी मिळाली. महिलांनी पुरुषांच्या बरोबरीने काम करावे, निर्णय घ्यावेत आणि कुटुंब, समाज आणि देशात स्वतःचे स्थान निर्माण करावे, असा त्यांचा दृष्टिकोन होता. आजच्या काळात ज्या स्त्रिया विविध क्षेत्रांमध्ये काम करतात, त्यांना स्वतंत्र विचारांची आणि निर्णय घेण्याची मुभा आहे. ते डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या दूरदृष्टीमुळेच शक्य झाले आहे. त्यांच्या संघर्षामुळे महिलांना समाजात प्रतिष्ठा मिळाली, ज्यामुळे आम्ही आज सन्मानाने जगू शकतो, आमचे अधिकार मिळवू शकतो आणि स्वतंत्र निर्णय घेऊ शकतो. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या हक्कांसाठी जे कार्य केले त्याचा समाजावर मोठा परिणाम झाला. त्यांच्या महिला सबलीकरणाच्या विचारसरणीची परिणीती म्हणजे हिंदू कोड बिल ज्याने भारतातील महिलांना त्यांच्या मूलभूत अधिकारांवर आधारित न्याय दिला. मात्र या विचारांच्या अंमलबजावणीसाठी त्यांना अनेक विरोधांचा सामना करावा लागला आणि याच संघर्षांमुळे त्यांनी अखेर मंत्रिपदाचा राजीनामा दिला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे भारतीय संविधानाच्या मसुदा समितीचे अध्यक्ष होते. परंतु संविधानाच्या पलीकडेही त्यांनी भारतीय समाजाच्या उन्नतीसाठी अनेक विधेयके आणि धोरणांची मांडणी केली. त्यापैकी एक महत्त्वाचे विधेयक म्हणजे हिंदू कोड बिल. हे बिल हिंदू समाजातील महिलांसाठी असलेल्या विषमतेच्या आणि अन्यायाच्या परिस्थितीला दूर करण्यासाठी तयार केले गेले होते. विवाह किंवा घटस्फोटाच्या बाबतीतही महिलांना कोणतेही स्वतंत्र अधिकार नव्हते. हे विधेयक या सर्व गोष्टी बदलण्याची क्षमता ठेवत होते. हिंदू कोड बिलाची मांडणी करताना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रचंड विरोधाचा सामना करावा लागला. तत्कालीन भारतीय समाज विशेषतः पारंपरिक विचारसरणीचे लोक या बदलांना मान्य करण्यास तयार नव्हते. त्यांना असे वाटत होते की हे विधेयक हिंदू धर्माच्या पारंपरिक रचनेला धक्का देईल आणि समाजातील व्यवस्थेला बदलून टाकेल. अनेक नेत्यांनीही या विधेयकाला विरोध केला ज्यामुळे विधेयक मंजूर होण्यास विलंब झाला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसाठी हे फक्त एक विधेयक नव्हते तर हा एक सामाजिक न्यायाचा लढा होता. त्यांनी अनेक ठिकाणी या विधेयकाच्या समर्थनार्थ भाषणे दिली आणि महिलांच्या हक्कांचे महत्त्व मांडले. परंतु विधेयक पारित होण्यास विरोधामुळे त्यांना निराशा आली. डॉ. आंबेडकरांच्या मते हिंदू कोड बिल हे महिलांसाठी सामाजिक न्याय देण्याचे महत्त्वपूर्ण साधन होते. परंतु जेव्हा त्यांना समजले की पंडित जवाहरलाल नेहरू सरकार या विधेयकाला पुढे नेण्यास तयार नाही तेव्हा त्यांनी 27 सप्टेंबर 1951 रोजी आपल्या कायदा मंत्रीपदाचा राजीनामा दिला. त्यांच्या मते जर या मूलभूत अधिकारांसाठी सरकार कार्य करणार नसेल तर मंत्रिपदावर राहण्याला काही उपयोग नाही. म्हणून डॉ. बाबासाहेबांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला. राजीनामा दिल्यानंतर डॉ. बाबासाहेबांनी स्पष्टपणे सांगितले की या विधेयकाला विरोध म्हणजे महिलांच्या हक्कांचा विरोध आहे. ते म्हणाले 'जर हा देश महिलांना समान हक्क देऊ शकत नसेल, तर त्यात राहण्यात माझ्या काहीच अर्थ नाही.' महिलांच्या हक्कांसाठी डॉ. बाबासाहेबांचे कार्य हिंदू कोड बिलापुरतेच मर्यादित नव्हते. त्यांनी आपल्या संपूर्ण कारकिर्दीत महिलांच्या सन्मान आणि समानतेसाठी कार्य केले. संविधानाच्या माध्यमातून त्यांनी महिलांसाठी अनेक हक्क निश्चित केले. महिला शिक्षण, रोजगार आणि सामाजिक न्याय या बाबींमध्ये ते नेहमीच आघाडीवर होते. त्यांनी स्पष्ट केले होते की, कोणत्याही समाजाचा प्रगतीचा मार्ग म्हणजे त्या समाजातील महिलांच्या स्थितीत सुधारणा घडवणे. डॉ. बाबासाहेबांचे महिलांच्या सन्मानासाठी केलेले कार्य आजही आपल्याला प्रेरणा देते. त्यांच्या कार्यामुळेच भारतीय महिलांना आज स्वतंत्रपणे आपले जीवन जगण्याचे हक्क मिळाले आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या हक्कांसाठी दिलेला लढा हे एक ऐतिहासिक उदाहरण आहे. त्यांच्या हिंदू कोड बिलाच्या प्रयत्नांमुळे त्यांनी समाजात मोठा बदल घडवून आणला. या विधेयकाने महिलांच्या सन्मानाच्या आणि समानतेच्या लढ्याला अधिक बळ दिले. मंत्रिपदाचा त्याग करूनही, डॉ. बाबासाहेबांनी आपली वचनबद्धता सिद्ध केली की, सामाजिक न्याय आणि समानता हेच त्यांच्या जीवनाचे ध्येय आहे. डॉ. बाबासाहेबांनी महिलांना दिलेली ही सामाजिक आणि कायदेशीर शक्तीच आजच्या आधुनिक भारतीय महिलांना खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळवून देते. त्यांच्या या विचारसरणीमुळेच भारतीय समाजातील महिलांचे अस्तित्व सशक्त आणि सन्मानाने उभारलेले आहे. ■■



बहुजन सौरभ

मीनाक्षी दमयंती,
मो. 8275952542

# बौद्धांचे लग्न आणि चर्चेचा विषय!



बहुजन सौरभ

आपला हा लेख वाचला, खुप बरे वाटले, समाजात उशिरा लग्न लावण्याची जी वाईट प्रथा सुरु झाली आहे, त्या वर प्रकाश टाकला आहे, मी लग्न पत्रिकेवर दिलेल्या वेळेवर 5-6 लग्नाला पोहचलो, लग्न वेळेवर होत नाही हे पाहून संबंधित वधू-वर पक्षाची भेट घेऊन आणि त्यांनी इतर लोकांच्या वेळेचे महत्व लक्षात घेऊन वेळेवर लग्न लावणे आवश्यक आहे याची जाणीव करून देऊन लग्न न लावताच निघून आलो आहे. दिलेल्या वेळेत (अर्धा तास इकडे तिकडे) लग्न न लावणाऱ्या वधू-वराचे लग्नाला भंतेजी व बौद्धचार्य यांनी थांबूच नये. असा सामाजिक संदेशच वेळोवेळी प्रसिद्ध करावा, जनजागृती केल्याशिवाय सुधारणा होणार नाही, असे माझे मत आहे. जनजागृतीसाठी आपल्याला शुभेच्छा आणि सहकार्य देखील... अतिशय चांगली आणि महत्त्वाची पोस्ट आहे ही बौद्ध समाजासाठी माझे लग्न नागपूर येथे 2008 मध्ये झाले. माझे लग्न 11.30 वा. होते. मी सुद्धा 11.30 वाजताच लग्न लावले होते. मी सुद्धा लग्न वेळेवर लागावे या विचाराचा आहे. वधू आणि वराच्या वडिलाने लोकांच्या वेळेचा विचार केला पाहिजे. मौजमजा आनंद हा लग्न विवाह प्रसंगी असतोच यात शंका नाही. परंतु वेळेचे भान असणे आवश्यक आहे. आज बौद्ध धर्मातील 10.00 वा. चे असलेले लग्न 3.00 ते 5.00 वाजता लागते. ही बाब अतिशय गंभीर आणि लाजिरवाणी आहे. आज या बाबीची समीक्षा करण्याची गरज आहे. वधू-वराने माझे लग्न वेळेवरच लागावे हा हट्ट धरला पाहिजे व तसे नियोजन वधू-वराने केले पाहिजे. वराने कोणत्याही परिस्थितीत विवाह वेळेच्या 10 मिनिटांपूर्वी आपल्या आसनावर स्थानापन्न होण्याची गरज आहे. भारतीय बौद्ध महासभेच्या आवाहानाला प्रतिसाद तीन विवाह वेळेवर लागले -

**रिसोड :-** भारतीय बौद्ध महासभा ही संस्कार संस्था असून संस्थेची स्थापना बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केली. त्यांनी संस्थेचे धेय्य, उद्दिष्ट निश्चित केलेले आहेत. त्यानुसार भारतीय बौद्ध महासभा समाजात विविध संस्कार देते. समाजात अति महत्वाचा सोहळा म्हणजे विवाह सोहळा. पण हल्लीचे विवाह मात्र खुप विलंबाने लागत असल्याने लग्नात येणाऱ्यांना खुप त्रास होतो. दूरवरून आलेली बायका, मुले, प्रतिष्ठित मंडळी विवाह करिता येतात. परंतु डीजेमुळे नाच-गाणे होत असल्याने पाच सहा तास उशिराने लग्न लागल्याने अन्नाची नासाडी होते. लग्नात आलेल्यांना परत जाण्याची अडचण होते. हे भारतीय बौद्ध महासभेच्या पदाधिकाऱ्याच्या लक्षात आले. समाजातून मागणी होती कि लग्न वेळेवर लागण्यासाठी प्रयत्न करावे. तेव्हा भारतीय बौद्ध महासभेच्या वतिने ठराव परीत केला होता. त्यावर अमल सुरु केला. परंतु परिणाम मात्र शुन्य. बौद्धांचार्यांनी नकार दिल्यास कोणी उठून तो पीलेला असला तरी ही विधी घेते. भंतेजीना तर वेळेचे बंधन नाहीच. या वर्षी भारतीय बौद्ध महासभेचे रिसोड तालुका अध्यक्ष तथा केंद्रिय शिक्षक शालिग्राम पठाडे यांनी आवाहन केले होते की, जे कोणी वेळेवर विवाह विधी पार पाडतील त्यांना संस्थेचे वतिने विनामुल्य विवाह प्रमाण पत्र देण्यात येईल व त्या कुटुंबाचा सत्कार करण्यात येईल. आवाहानाला प्रथम प्रतिसाद व्याड येथील सेवानिवृत प्राचार्य भास्कर गायकवाड याचे सुपुत्र अजिंक्य यांचा मंगल परिणम विधी वाघजाळी येथील सिद्धार्थ मोरे यांची सुकन्या मनिषा सोबत दि 11 मे 2025 रोजी दुपारी 1.30वा नियोजीत वेळी, तसेच दुसरा विवाह कवठा येथे मुकिंदा साबळे यांची कन्या संगिता संग सुभाष वानखेडे कोयाळी यांचे सुपुत्र आकाश यांचा मंगल परिणय विधी सुद्धा 11मे लाच दुपारी 4.30वा. पत्रिकेवरील नियोजीत वेळेवर बौद्धाचार्य कैलास सुर्वे यांनी घेतला. तसेच 20मे रोजी कवठा येथे विजय अंभोरे कवठा यांची कन्या मयुरी मोहन धांडे खडकी सदर यांचे सुपुत्र पवन संग दुपारी 3.45 वा पत्रिकेवरील नियोजीत वेळेवर बौद्धाचार्य मोहन धांडे यांनी पार पाडला. या करिता प्रयत्न, सहकार्य प्रा. रंगनाथ धांडे यांनी केले. या सगळ्याचे अभिनंदन जिल्हाध्यक्ष सिद्धार्थ भगत, महासचिव देवानंद वाकोडे, विभागीय संघटिका संध्याताई पंडित, जिल्हा महासचिव मंदाताई वाघमारे, यांनी केले. यांना व अजुन काही मंगल परिणय विधी वेळेवर पार पडतील यांचा भारतीय बौद्ध महासभेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात येईल व समाजानी यांचा आदर्श घेण्यासाठी प्रसिद्धी देण्यात येईल असे तालुकाध्यक्ष शालिग्राम पठाडे यांनी सांगितले. अशा प्रकारचे संपूर्ण महाराष्ट्रातून खूप मेसेज व्हाट्सअप वर लोकांनी पाठविले, त्यापैकी काहीच मेसेज आपण येथे जसेच्या तसे टाकलेले आहे. समाजात बदल घडवण्याची खरेच काळाची गरज आहे. आजच्या घडीला सगळ्यात प्रगत समाज जर आपण आहोत तर मग बदलसुद्धा आपणच घडविला पाहिजे... ■■



संगीता चव्हाण
मो. 8329863644

# विवाह सोहळ्यात जोपासली सामाजिक बांधिलकी
# मानकर परिवाराकडून वृद्धाश्रमासाठी निधी दान



**नागपूर :** आज-काल मध्यमवर्गीय सुद्धा लग्न, वाढदिवस ई. कार्यक्रमात सढळ हातांनी खर्च करताना दिसून येतात. घरातील मुलामुलींचे लग्न सोहळा साजरा करताना वरात, घोडा, गाडी, रोषणाई, बँड बाजा, विविध प्रकारचे व्यंजन इत्यादींवर मोठा खर्च केला जातो. लग्न आयुष्यात एकदाच होते. त्यामुळे सढळ हाताने खर्च करण्याची पद्धत आज रूढ झालेली आपण आज पाहतो आहे. पण हे करतानाच काही लोक सामाजिक बांधिलकी सुद्धा जोपासत असताना दिसत आहे. नुकताच यवतमाळ येथे बेलोरा गावातील आनंदराव मानकर यांची मुलगी डॉ. पल्लवी व बुलढाणा जिल्ह्यातील चिखली या गावाचे प्रकाश गवई यांचा मुलगा डॉ. पवन यांचा मंगल परिणय सोहळा पार पडला. यवतमाळ जिल्ह्यातील बेलोरा गावातील शिक्षणाची कास धरलेल्या मानकर परिवारांमधून मागील 30-40 वर्षात अनेक अधिकारी, प्राध्यापक, इंजिनिअर, डॉक्टर, शिक्षक तयार झालेले आहे. कालवश सोनबाजी मानकर व मैनाबाई सोनबाजी मानकर या दाम्पत्याचे मुले मुली सुद्धा प्राध्यापक, पोलीस व वनाधिकारी झाले. त्यांचे नातू सुद्धा इंजिनियर डॉक्टर झालेले आहे. डॉक्टर पल्लवी यांचा विवाह सोहळा नुकताच पार पडला. विवाह सोहळ्याच्या निमित्ताने मानकर परिवाराने त्यांच्याच गावात आसान्या फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेच्या माध्यमातून तयार होत असलेल्या स्वर्गीय सुमित गुघाणे वृद्धाश्रमाच्या उभारणीसाठी वधूवरांच्या हस्ते रु. 25 हजाराचा धनादेश वृद्धाश्रमाचे संचालक डॉ. सुशील वानखेडे यांच्या हाती सुपूर्द केला. विवाह सोहळ्यात मानकर परिवाराने जोपासलेल्या सामाजिक बांधिलकिमुळे सोहळ्यात उपस्थित समाज बांधवांनी मानकर परिवारांचे कौतुक केले आहे. विवाह सोहळ्यात होणाऱ्या खर्चातला काही अंश हा सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या संस्थांना दिला तर अनेक समाज उपयोगी उपक्रम पूर्णत्वास नेऊ शकतो अशी भावना त्यांनी व्यक्त केली. वृद्धाश्रमाला दिलेल्या मदत स्वीकारताना डॉ. सुशील वानखेडे यांनी मानकर परिवाराचे आभार मानले.

# रमाईच्या संघर्षमय पैलूंना बार्टी उजाळा देणार : सुनील वारे



**पुणे :** त्यागमूर्ती माता रमाईचा संघर्ष मोठा असून महापुरुषांच्या यशात त्यांच्या सहचरणीचे योगदान अत्यंत महत्त्वपूर्ण असून माता रमाईच्या जीवनातील संघर्ष, त्याग आणि कठीण परिस्थितीतूनही त्यांनी महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहुन दिलेली साथ यामुळेच महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर घडले. माता रमाईच्या जीवनातील अनेक संघर्षमय आठवणी आणि त्यांचे विविध पैलू बार्टी रमाई संशोधन प्रकल्पाद्वारे उलगडणार असल्याचे मत बार्टी संस्थेचे महासंचालक सुनील वारे यांनी रमाईच्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी) पुणे येथे दि. 27 मे 2025 रोजी माता रमाईच्या स्मृतीदिनानिमित्त माता रमाई व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस महासंचालक वारे यांच्या हस्ते पुष्पमाला अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले. यावेळी अभिवादन करतांना महासंचालक म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जागतिक पातळीवरचे महान नेते होते. त्यांचे व्यक्तिमत्व हे हिमालयासारखे उत्तुंग होते. रमाईने आयुष्यभर दुःखाशी संकटाशी संघर्ष केला. वाडिया महाविद्यालयासमोरील महामाता रमामाई भीमराव आंबेडकर राष्ट्रीय स्मारकातील रमाईच्या पूर्णाकृती पुतळ्यास महासंचालक वारे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. याप्रसंगी अध्यक्ष विठ्ठलदादा गायकवाड, माजी उपमहापौर सुनिता वाडेकर, नगरसेविका लता राजगुरू, परशुराम वाडेकर यांच्या हस्ते महासंचालक यांना पंचशीलेची शाल व ग्रंथ भेट देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी निबंधक इंदिरा अस्वार, विभागप्रमुख स्नेहल भोषले, उमेश सोनवणे, अनिल कारंडे, दादासाहेब गिते, यांच्यासह बार्टी संस्थेतील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन रामदास लोखंडे यांनी केले. आभार वैशाली खांडेकर यांनी मानले.




## तथागत बुद्ध विहार, वकील पेठ, नागपूर

नियमित वंदना, जयंती, पौर्णिमा विविध कार्यक्रमांचे आयोजन सह आंबेडकरी चळवळ, बौद्ध संस्कृती विज्ञानाच्या कसोटीवर तपासून मजबूत करण्यासाठी भरपूर प्रयास विहाराच्या माध्यमातून होत आहे. प्रमुख अशोक गजभिये (9437095413), अरविंद वासनिक, आकाश गेडाम, प्रदीप चनकापुरे, प्रिती मेश्राम, माया तिरपुडे (8698013996) राजेश निहीते. विहाराचे व्यवस्थापन करीत आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
8600924170

# महत्वाचे

## प्रेरणा मारोतराव कुमरे हिचे अभिनंदन



**नागपूर :** कोलारमारा पेंच पर्यटन स्थळ येथील प्रेरणा मारोतराव कुमरे ही आदिवासी मुलगी 10 व्या वर्गात 62टक्के घेऊन उत्तीर्ण झाली. आई फुला कुमरे व वडील मारोतराव शेती आणि पर्यटकांना जेवणाची सोय करून उदरनिर्वाह करतात. ही डॉ. विलकीन्शन मेमोरियल हायस्कूल मध्ये शिक्षण घेतले आहे. शिक्षण घेत असतांना आई वडिलांच्या कामात सहकार्य करून अभ्यास करीत होती. बहुजन सौरभ तर्फे नागेश बुरबुरे यांनी या मुलीची मुलाखत घेऊन प्रशंसा केली व अभिनंदन केले व उच्च शिक्षणा करिता मदतीचे आश्वासन दिले.

## संविधानाचे प्रकाशन आणि वितरण कार्यक्रम



**नागपूर :** एकता फाउंडेशन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष डॉ. जय संजय रामटेके यांनी मोफत संकलित केलेल्या संक्षिप्त संविधानावरील पुस्तकाचे प्रकाशन नगरसेवक दुनेश्वर पेठे यांच्या हस्ते करण्यात आले. रवी भवन नागपूर येथे आयोजित करण्यात आला होता. संविधानाचे मोफत संक्षिप्त प्रकाशन आणि वितरण करण्यात आले. अश्विन फकिर्डे, शेखर पाटील, वसीम शेख (लाला), अनिल बोकडे, मिर्जा जावेद बेग, संदीप मेंढे, कमलेश गिडवाणी आदी उपस्थित होते. यावेळी वक्त्यांनी संविधानाचा मूळ भाव समजून घेण्याच्या आणि त्याचे पालन करण्याच्या गरजेवर भर दिला. या कार्यक्रमाचा उद्देश समाजात परस्पर बंधुता, समानता आणि न्यायाचा संदेश पसरवणे हा होता. सर्वांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले आणि संविधानाच्या या अनोख्या सादरीकरणाबद्दल डॉ. जय संजय रामटेके यांचे अभिनंदन केले

## म्युर मेमोरियल हॉस्पिटल तर्फे हज यात्रेकरूंकरिता वैद्यकीय तपासणी शिबिर



**नागपूर :** हज यात्रेकरूंमध्ये आरोग्य आणि कल्याणाची जाणीव वाढवण्यासाठी म्युर मेमोरियल हॉस्पिटल, नागपूरच्यावतीने एक पूर्व-वैद्यकीय तपासणी शिबिर यशस्वीरित्या आयोजित करण्यात आले. शिबिराचे नेतृत्व डॉ. फरहीन कुरेशी यांनी केले आणि त्यांना हॉस्पिटलच्या परिचारिका आणि कर्मचारी वर्गाने उत्तम साथ दिली. शिबिराचे समन्वयक प्रतिभा आणि शरीक शेख यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. या शिबिरामध्ये एकूण 24 रुग्णांची तपासणी करण्यात आली आणि विविध आरोग्य समस्यांवर मार्गदर्शन देण्यात आले. एका रुग्णामध्ये गंभीर आरोग्य स्थिती आढळल्यामुळे त्याला तात्काळ मेयो हॉस्पिटलमध्ये पाठवण्यात आले. या शिबिराला प्रचंड प्रमाणात प्रतिसाद मिळाला आणि म्युर मेमोरियल हॉस्पिटलच्या कार्यक्षम आणि समर्पित टीममुळे ते यशस्वीरित्या पार पडले.

## तथागत बौद्ध विहार प्रेरणा नगर तर्फे, त्यागमूर्ती रमाई यांना आदरांजली



**नागपूर :** प्रेरणा नगर येथे तथागत बुद्ध विहार यांचे वतीने त्यागमूर्ती रमाबाई आंबेडकर यांना आदरांजली वाहण्यात आली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. नाना शेंडे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रम झाला. प्रमुख अतिथी भारतीय बौद्ध महासभेचे दक्षिण विभागाचे अध्यक्ष अंकुश गणवीर पाटील, गयाबाई देवगडे यांच्या हस्ते माल्यार्पण करून बुद्ध वंदनेने आदरांजली वाहिली. याप्रसंगी अध्यक्षीय भाषणात प्रा. नाना शेंडे यांनी 'रमाबाईचा त्याग जगातील संपूर्ण महिला वर्गाला एक आदर्श आहे', असे मौलिक विचार व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंकुश गणवीर, तर संचालन डॉ. विलास धवाले, तर आभार हरेश्वर शहारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे सचिव दिनकर खोब्रागडे, संगीता मेश्राम, शिल्पा गवंडे, बेबी दमके, रिद्धिमा माटे, मानवटकर, सातपुते, संध्या देवगडे, मधुशीला भांबोर, उपासक-उपासिका मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

## निधन वार्ता

### रमेशराव मोरणकर



**नागपूर :** लालगंज बाहुली विहार जवळ गुजरी रोड, नागपूर येथील निवासी रमेशराव मोरणकर यांचे दि. 29-मे -2025 रोजी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय 80 होते. अंतिम संस्कार 30 मे रोजी सकाळी 10 वाजता. शांतीनगर घाट इतवारी येथे करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, दोन मुली व बराच मोठा आप्त परिवार आहे.

# ऑफ्रोहचे पदोन्नती व अनुकंपा धोरणासाठी निदर्शने




**अमरावती :** दि. 29 मे रोजी ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन (ऑफ्रोह) महाराष्ट्रचे वतीने विविध मागण्यासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नारे- निदर्शने चा कार्यक्रम संपन्न झाला. अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांचे जात प्रमाणपत्र फसवणूकीने, लबाडीने व खोटी कारणे नमूद करून रद्द करण्यात आल्यानंतर या कर्मचाऱ्यांना 21 डिसेंबर 2021 रोजी अधिसंख्य पदावर वर्ग करून अन्याय केला होता. या अन्यायाची दुरूस्ती करण्यासाठी शासनाने 14 डिसेंबर 2022 रोजी नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे सेवानिवृत्त वेतन मंजूर करण्यात आले. तसेच त्यानंतर 4 ऑक्टोबर 2024 रोजी नियमित वेतनवाढी मिळण्यासाठी 1 दिवसाचा तांत्रिक खंड क्षमापित करण्यात आला. तथापि 10, 20, 30 वर्षानंतर आश्वासित प्रगती योजना व नियमित पदोन्नतीचे लाभ आणि अनुकंपा नोकरीवर धोरणाचे लाभ नाकारण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच दि 28 एप्रिल 2025 रोजी 67 कर्मचाऱ्यांचे अधिसंख्य पदाचे आदेश रद्द करण्याचा औरंगाबाद उच्च न्यायालयाचा निर्णय कायम केला आहेत. त्यामुळे कोणत्याच अनुसूचित जमातीतील कर्मचाऱ्यांस अधिसंख्य पदावर वर्ग करता येत नाहीत. त्यामुळे सर्व कर्मचाऱ्यांस नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे पदोन्नती व अनुकंपा धोरणाचे लाभ देय आहेत. हे लाभ मिळण्यासाठी आफ्रोह तर्फे अनेक वेळा निवेदने देण्यात आली. परंतू शासनाने दखल न घेतल्याने शासनाला व लोकप्रतिनिधींना जाग करण्यासाठी दि. 29 मे रोजी. अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयासमोर नारे निदर्शने कार्यक्रम घेण्यात आला.

या प्रसंगी मोठ्या प्रमाणावर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे नेतृत्व डॉ. दीपक केदार, मनिष पंचगाम, यशवंत वरुडकर यांनी केले. या कार्यक्रमात खालील कर्मचारी प्रामुख्याने सहभागी होते. डॉ. दिपक केदार राज्यमहासचिव, मनिष पंचगाम राज्य कोषाध्यक्ष, निता सोमवंशी राज्य उपाध्यक्ष, यशवंत वरुडकर जिल्हाध्यक्ष, निलीमा केदार जिल्हाध्यक्ष, नरेंन्द ढोलवाडे जिल्हा सचिव, रतन नाथे जिल्हा कार्याध्यक्ष, सुहास पंचभैये, अशोक पराते, सुषमा हिंगे, अलका सोरटे, राजेंन्द्र पाटणकर, हेमा पाटणकर, गुलाब हेडाऊ, प्रमोद पाटणकर, सुभाष पाटणकर, वनिता लिखार, दिनेश कडु, प्रिती तिडके, कांता वरुडकर,कल्पना धोपे 22) दिलीप सोनकुसरे, पवन ठाकूर, ए.ए. पराते, सुधिर दाभाडे, रविंद्र कुंभारे, जि. व्हि. लोखंडे, अरविंद रायकवार, रविन्द्र भुरून्दे, कैलास निर्मळ, पि. एस. घुन्टींवार, प्रशांत निनावे. महाराष्ट्रभर जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आंदोलन करीत आहेत. जिल्हाधिकारी यांना या मागणीबाबत निवेदन देण्यात आले आहेत.

# शिवराज्याभिषेकानिमित्त अमरावती येथे आयएएस विद्यार्थ्यांचा सत्कार




**अमरावती :** या वर्षीच्या निकालामध्ये आयएएस झालेल्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार शिवराज्याभिषेक दिनानिमित्त येत्या सहा जून रोजी सकाळी 11 वाजता अमरावतीच्या शेगाव नाका चौकातील अभियंता भवन मध्ये आयोजित करण्यात आलेला आहे. या सत्कार समारंभाच्या अध्यक्षस्थानी लेडी गव्हर्नर व सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीश पदी विराजमान झालेले भूषण गवई यांच्या मातोश्री प्राचार्य डॉ. कमल गवई या उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे अमरावतीच्या विभागीय आयुक्त श्वेता सिंघल पोलीस महानिरीक्षक रामदास पोकळे जिल्हाधिकारी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र तसेच अमरावती महानगरपालिकेचे आयुक्त सचिन कलंत्रे, जिल्हा पोलीस अधिक्षक विशाल आनंद व मुद्रांक जिल्हाधिकारी अनिल औतकर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. या कार्यक्रमांमध्ये यावर्षी केंद्रीय लोकसेवा आयोगाची आयएएस ही परीक्षा उत्तीर्ण झालेले अदीबा अनम यवतमाळ, रजत पत्रे धामणगाव रेल्वे, डॉ. जयकुमार आडे यवतमाळ, नम्रता ठाकरे वरूड, मोहिनी प्रल्हाद खंडारे बुलढाणा, डॉ. अश्विनी धामणकर मंगरूळपीर, अभय देशमुख यवतमाळ, डॉ. पंकज पटले गोंदिया यांचा व त्यांच्या आई-वडिलांचा सत्कार करण्यात येणार आहे. या कार्यक्रमात हे सर्व विद्यार्थी स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार असून त्यांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देणार आहेत. या कार्यक्रमाचे आयोजन डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकॅडमीच्या मिशन आयएएस व युवा संवाद प्रतिष्ठान यांच्या वतीने संयोजक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे व नितीन पवित्रकार यांच्यावतीने करण्यात आले आहे. या सत्काराला व स्पर्धा परीक्षा कार्यशाळेला स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे अशी विनंती या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. गजानन फुंडकर, मिशन आय ए एस.चे अध्यक्ष डी. व्ही. मोडक, कार्याध्यक्ष नरेंद्र बोरकर, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. रा. गो. चवरे, सहसंचालक राजेंद्र इंगोले यांनी एका संयुक्त पत्रकाराने केली आहे.

# 1 ते 10 जून बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर



**नागपूर :** भारतीय बौद्ध महासभा जिल्हा शाखा वर्धाचे विद्यमाने देवानंद वानखेडे, वरिष्ठ केंद्रीय शिक्षक, यांच्या मार्गदर्शनाखाली बौद्धाचार्य श्रामणेर शिबीर दि. 1 ते 10 जून 2025 पर्यंत दहा दिवसाचे आयोजन 'ओम पालीस्टीक कॉलेज जवळ समता नगर वर्धा' या ठिकाणी आयोजन करण्यात आले आहे. प्रवज्जा विधी पूज्य भन्ते चित्त ज्योती हे देणार असून, मार्गदर्शक म्हणून वरिष्ठ केंद्रीय शिक्षक देवानंद वानखेडे नागपूर हे दहा दिवस मार्गदर्शन करणार आहेत.

शिबीरामध्ये विविध विषय शिकविल्या जाईल. त्यामध्ये प्रामुख्याने :- (1)भगवान बुद्धाचे संपूर्ण चरित्र, भाग-1, भाग-2. (2) डॉ. बाबासाहेबांचे संपूर्ण चरित्र, भाग-1, भाग-2. (3)बौद्ध धम्मात मूर्ती पुजेचे स्थान. (4)त्रिरत्न वंदना (अर्थासहीत). (5)धम्मदीक्षा विधी कां करावा(प्रॉक्टीकल). (6)परीत्राण पाठ (अर्थासहीत). (7)बुद्ध-धम्म-संघ (अर्थासहीत). (8)बौद्धांचे त्यौहार, मंगल दिन. (9)नामकरण विधी (प्रॅक्टीकल). (10)करणीयमेत्त सुत्त (अर्थासहीत). (11)बौद्ध धम्माचे संदेश वाहक. (12)बौद्ध धम्माचे पवित्रस्थळे. (13)विद्यारेभ विधी (प्रॅक्टीकल). (14)गर्भ मंगल विधि. (15)महामंगल सुत्त (अर्थासहीत). (16)अष्टांगीक मार्ग. (17)अंद्धश्रद्धा व बुवाबाजी. (18)साक्षगंध विधी (प्रॅक्टीकल). (19)आदेश, सब्बसुख गाथा, संकल्प. (20)विवाह विधी (प्रॅक्टीकल). (21)धम्म-अधम्म-सद्धम्म. (22)अंत्यविधी, पुण्यानुमोदन, स्मृतीदीन (प्रॅक्टीकल). (23)महामंगल गाथा(अर्थासहीत). (24)दहा पारमीता, परीत्राणपाठ. (25)सिगाल सुत्त(गृहस्थाला उपदेश). (26)भुमीपुजन, गृहप्रवेश, मुर्ती प्रतिष्ठापणा, उद्घाटन(प्रॅक्टीकल). (27)धम्मध्वज वंदना अर्था सहित,(पंचशील ध्वज कि धम्मध्वज). (28)आशीर्वाद गाथा, पराभवसुत्त(मानवाच्या पराभवाची कारणे). (29)जयमंगल अष्ठगाथा (अर्थासहीत). (30)दि बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडीया व तिचे कार्य. (31)निब्बान-परीनिब्बान-महापरी निब्बान इत्यादी शिकविले जाणार आहे अशी माहिती राहुल गायकवाड भारतीय बौद्ध महासभा, जिल्हा शाखा वर्धा यांनी दिली आहे.



# प्रज्ञाज्योत विहारात माता रमाई आंबेडकर यांना अभिवादन

**नागपूर :** माता रमाई आंबेडकर यांचा 90 वा स्मृती दिवस प्रज्ञाज्योत बुद्धविहारात अभिवादन केले. सर्वप्रथम सर्व उपासक व उपासिका यांनी पुष्पगुच्छ वाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर व रमाई आंबेडकर यांना अभिवादन करण्यात आले. विचारमंचावर या कार्यक्रमाचे अध्यक्ष एन.व्ही. बहादुरे आणि मुख्य वक्ता मिलिन्द मेश्राम होते. सुनिता वासनिक, सुमन साखरे, आशा बोरकर, वैशाली डोंगरे यांनी आपले अभिवादन व्यक्त केले. प्रास्ताविक व संचालन भगवान निमगडे (कोषाध्यक्ष) यांनी केल. मुख्य वक्ता म्हणून मिलिंद मेश्राम (उपाध्यक्ष) यांनी रमाईच्या जीवनावर सविस्तर प्रकाश टाकला आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या हृदयात रमाईबद्दल किती उदात्त भावना होत्या, त्या सांगितल्या. अध्यक्षीय भाषण निलकंठ बहादुरे यांनी केल. त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनात रमाईचे महत्त्व विविध उपमाद्वारे सांगितले. आभार प्रदर्शन भिमराव सोनटक्के यांनी केले.

# द बुद्धिस्ट गोल्डन इरा वुमन्स फाउंडेशनचे रमाई आंबेडकरांना अभिवादन



**नागपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय कन्व्हेंशन सभागृह येथे वरील संस्थेने आणि दिशा फाउंडेशन यांनी संयुक्तरित्या रमाई स्मृती दिनानिमित्त त्यांना विनम्र अभिवादन केले. या कार्यक्रमाला विशेष अतिथी मालती प्रभाकर वराडे आणि त्यांचे सुपुत्र गायक संगीतकार कुणाल वराडे लाभले, तसेच कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा. देविदास घोडेस्वार होते आणि विशेष अतिथीचे स्वागत दिशा फाउंडेशनचे अध्यक्ष वामन सोमकुंवर यांनी केले. तसेच मंचावर पाहुणे जमुना दगावकर, तक्षशिला वाघधरे, निर्मला वाघधरे, गौतमी डोंगरे (खोब्रागडे), सुनंदा कोचे, रेखा लोखंडे आणि आर्याजी धम्मसूची उपस्थित होत्या आणि त्यांनी सुद्धा आपल्या मनोगत मांडले. शिवाय मालती वराडे यांनी रमाईचे अनेक हृदयस्पर्शी आठवणी सांगितल्या. कार्यक्रमाचे संचालन छाया बेहरे (खोब्रागडे) यांनी केले कार्यक्रमाचे यशस्वी होण्यामागे दि बुद्धिस्ट गोल्डन एरा फाउंडेशनच्या अध्यक्षा सुनंदा कोचे, सचिव डॉ. अर्चना सुखदेवे, प्रिया गजभिये, रेखा लोखंडे, योगिता शेंडे, सोनाली ठवरे, शोभना टेंभुर्णे, अर्चना टेंभुर्णे, रजनी तायडे, अनुपमा रामटेके यांचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे आभार ॲड. अस्मिता तिडके, यांनी केले व विशेष आभार सुनील गजभिये आणि प्रदीप कऱ्हाडे.

# चप्राड येथे संत रविदास वाचनालयाला पुस्तके भेट



**लाखांदूर :** संत रविदास स्मृती वाचनालय चप्राड लाखांदूर येथे सामाजिक कार्यकर्ते व प्रबोधनकार हरिश्चंद्र लाडे यांनी एक हजार रुपये किंमतीचे पुस्तके दान केली आहेत. यावेळी सामाजिक कार्यकर्ते कवी धनंजय मुळे, विलास मुळे, कवी राहुल मेश्राम आणि इतर कार्यकर्ते उपस्थित होते. वाचन संस्कृती वाढली पाहिजे, मुला मुलींना वाचनाची आवड निर्माण झाली पाहिजे. महापुरुषांनी केलेल्या संघर्षाचा इतिहास तसेच त्यांनी घेतलेले कष्ट यांची सर्वांना जाणीव व्हावी, ते सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीमध्ये सक्रिय कार्यकर्ते बनावे या उदात्त हेतूने हरिश्चंद्र लाडे यांनी ही पुस्तके वाचनालयाला भेट दिली आहेत. याबद्दल कवी धनंजय मुळे यांनी त्यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी कवी राहुल मेश्राम यांनी सुद्धा हरिश्चंद्र लाडे यांना त्यांचा 'भीमसूर्य' कवितासंग्रह भेट दिला. 'पुस्तके ही ज्ञानाची भांडार आहेत. ती वाचल्याशिवाय व्यक्तीचा व्यक्तिमत्व विकास होऊ शकत नाही. यासाठी वैचारिक पुस्तके, स्पर्धात्मक पुस्तके, महापुरुषांची चरित्रे आणि आत्मचरित्रे, आपले संविधान इत्यादी पुस्तकांचे वाचन सर्वांनी केले पाहिजे. पुस्तके वाचन ही काळाची गरज आहे,' असे प्रतिपादन लाडे यांनी यावेळी केले. आभार विलास मुळे यानी मानले.

# रमानगर रेल्वे उड्डानपुलाचे काम दोन महिन्यात पूर्ण करा : ॲड. सुलेखा कुंभारे



**कामठी :** नविन कामठीला तसेच विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेस, अनेक शिखण संस्था, दादासाहेब कुंभारे बिडी कामगार वसाहत इत्यादीला जोडणाऱ्या रमा नगर उड्डानपुलाचे काम गेल्या 5 वर्षापासून रखडलेले असल्यामुळे लोकांना अनेक अडचणीचा सामना करावा लागत आहे. ऑक्टोबर महिन्यात धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त लाखोंच्या संख्येनी बौद्ध बांधव हे देशाच्या कानाकोपऱ्यातून नागपूर येथील दीक्षाभूमी सोबत विश्वविख्यात ड्रॅगन पॅलेसला भेट देत असतात. त्यामुळे धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी रमा नगर उड्डानपुलाचे काम पूर्ण करून लोकांकरिता खुले करावे असे निर्देश ओगावा सोसायटीच्या अध्यक्षा व माजी राज्यमंत्री ॲड. सुलेखा कुंभारे यांनी दिले.

रमा नगर उड्डानपुलाच्या बांधकामात येणाऱ्या अडवणी दुर करण्याच्या संदर्भात नुकतीच एक बैठक दि. 26/05/2025 रोजी रविभवन नागपूर येथे ॲड. सुलेखा कुंभारे यांच्या पुढाकाराने घेण्यात आली. रमा नगर उड्डानपुलाचे रेल्वे ट्रॅकवर ठेवण्यात येणाऱ्या गड्डर करिता रेल्वे वाहतुक किमान 3 ते 4 तास थांबविण्याची विनंती रेल्वे अधिकाऱ्यांना अनेकदा कंत्राटदारातर्फे करण्यात आली. परंतु रेल्वे ब्लॉक न केल्यामुळे पुढील कामामध्ये अडचण निर्माण होत आहे अशी व्यथा बांधकाम कंत्राटदाराने बैठकी दरम्यान मांडली. या संदर्भात, रेल्वे प्रशासनानी रेल्वे ब्लॉक करिता वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून आवश्यक परवानगी घेऊन 7 जुन 2025 पर्यंत रेल्वे ब्लॉक करून गड्डर बसविण्याचे काम पूर्ण करावे असे निर्देश ॲड. सुलेखा कुंभारे यांच्याकडून उपस्थित रेल्वे अधिकारी व बांधकाम कंत्राटदाराला देण्यात आले. बैठकीला लोककर्म विभागाच्या वतीने जनबंधु, रेल्वे प्रशासनच्या वतीने शशांक कुलश्रेष्ठ व बांधकाम एजंसीचे विजयवर्गी उपस्थित होते.


## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451



बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648